# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

**दिनांक २०/०९/२०२२ (मंगळवार)**

**(सकाळ)**

---

**अधिसुचना**

**दिनांक २३/०९/२०२२ रोजी भारत वि. ऑस्ट्रेलिया टी २० क्रिकेट सामन्या करीता सर्व प्रकारची जडवाहने व लोकल ट्रक वाहतुकीच्या व रहदारीचे नियमनाबाबत**

नागपूर जिल्हयातील जामठा क्रिकेट स्टेडीयम येथे दिनांक २३/०९/२०२२ रोजी भारत वि. ऑस्ट्रेलिया टी २० महत्वाचे सामना खेळला जाणार आहेत. या सामन्या दरम्यान राष्ट्रीय महामार्ग क्र. ७ बोरी ते नागपूर या महामार्गावर वाहनांची वर्दळ मोठया प्रमाणावर राहणार असुन प्रेक्षक वर्ग आपल्या चार चाकी/दोन चाकी वाहनाने व्हि.सी.ए. स्टेडीयम जामठा येथे सामना पाहण्याकरीता येणार आहेत. त्यामुळे उपरोक्त महामार्गावर वाहतूकीची कोंडी होवून अपघात प्रवण परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे व जड वाहने सदर गर्दीत अडकून त्यांची देखील गैरसोय होण्याची शक्यता आहे. वरील परिस्थिती टाळण्यासाठी दिनांक २३/०९/२०२२ रोजी दुपारी ०३.०० वा. ते रात्री १२.०० वा. पर्यंत सर्व प्रकारची जड वाहने व लोकल ट्रक वाहतूकीस राष्ट्रीय महामार्ग क्र. ७ आणि ४३ वरील बोरी वाय पॉईंट ते बोथली टि पॉईंट नागपूर ग्रामीण हद्दीपर्यंत प्रवेश देणे सर्व साधारण जनतेच्या जिवीतास धोकादायक आहे.

त्यानुसार मुंबई पोलीस अधिनियम कलम ३३ पोट कलम २(१) तसेच गृहविभाग क्र. एम. व्हि.ए. –०५८९/सी.आर–१०६१/टि.आर./ए–२, दिनांक १९/०५/१९९० अन्वये व ११५ मोटारवाहन कायदा १९९८ अन्वये राष्ट्रीय महामार्ग क्र. ७ आणि ४३ वरील बुटीबोरी वाय पॉईंट ते बोथली टिपॉईंट नागपूर ग्रामीण हद्दीपर्यंत दिनांक २३/९/२०२२ चे दुपारी ०३.०० वा. ते रात्री १२.०० वा. पर्यंत सर्वप्रकारच्या जड वाहने व लोकल ट्रक वाहतूकी करीता बंद करण्यात येत आहे. पर्यायी व्यवस्था म्हणून खालील मार्ग वाहनांच्या वाहतूकी करीता उपलब्ध आहेत.

१) चंद्रपूर रोड कडून येणारी सर्व प्रकारची जड वाहने व लोकल ट्रक वाहतूक बोरी वाय पॉईट येथून (डावे वळण घेवून) – एमआयडीसी ए.सी.सी. चौक (उजवे वळण घेवून) – एमआयडीसी गणेशपूर पाणी टाकी (उजवे वळण घेवून) – सीऐट कंपनीटी पॉईट (डावे वळण घेवून) –सालाईदाबा फाटा मार्गे नागपूर शहर हद्दीमधुन वळविण्यात येईल.

२) वर्धा रोड कडून येणारी सर्व प्रकारची जड वाहने व लोकल ट्रक वाहतुक टाकळघाट टि पॉईट येथून सर्व्हिस रोड मार्गे (डावे वळण घेवून)–एमआयडीसी ए.सी.सी. चौक (डावे वळण घेवून) – एमआयडीसी गणेशपूर पाणी टाकी (उजवे वळण घेवून)–सीऐट कंपनी टी पॉईट (डावे वळण घेवून) सालाईदाबा फाटा मार्गे नागपूर शहर हद्दीमधुन वळविण्यात येईल.

३) भंडारा व उमरेड कडून येणारी सर्व प्रकारची जड वाहतूक क्र. १ प्रमाणे विरुध्द दिशेने वळविण्यात यावी. आवश्यकतेनुसार दिलेल्या वेळे मध्ये अंशत: बदल करण्याबाबत निर्देशीत केले जाईल.

सबब वरील प्रमाणे मार्गामध्ये बदल करून पर्यायी मार्गाने क्रिकेट मॅचचे दिवशी वर नमुद वेळे दरम्यान जड वाहने व लोकल ट्रक वाहतुक वळविण्याबाबत सदर अधिसुचना पत्र जा.क्र. ११५१ दि.२०/९/२०२२ रोजी जाहीर करण्यात आली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**